अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात








बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -४९ | सोमवार दि.०६ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -49 | MONDAY DT. 06 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# ग्रामपंचायतीचे कारभारी ठरले!

## जयदत्तअण्णांकडे १०,आ.संदीप क्षीरसागर-३,डॉ.योगेश क्षीरसागरांकडे ३ ग्रामपंचायतीचा दावा

## जयदत्त क्षीरसागरांचा बीड विधानसभा मतदार संघात दबदबा तर मुंडे भगिनींची जोरदार मुसंडी, राजेंद्र मस्केची मेहनत फळाला







### केज / धारूर / माजलगांव विधानसभा मतदारसंघातील ग्रामपंचायतीचे निकाल

आडस:भाजप
होळ :भाजप
मुलेगांव:राष्ट्रवादी
बनकरांजा:राष्ट्रवादी
कोल्हेवाडी:भाजप
पिराचीवडी:भाजप
लिंबाचीवाडी:भाजप
सासुरा:भाजप
नांदूर:स्थानिक आघाडी
हंगेवाडी:भाजप
पिट्टी: भाजप
शिरपुरा:राष्ट्रवादी
डोनगाव:भाजप
माळेगाव:स्थानिक आघाडी
यसुफ वडगांव:स्थानिक आघाडी
बोरीसावर्गांव:भाजप
सुर्डी:भाजप
भालगाव: राष्ट्रवादी
बनसारोळा:राष्ट्रवादी
आरनगाव: भाजप
केकनवाडी: भाजप
भलगाव: बहीष्कार
तरनळी:भाजप

### गेवराई विधानसभा मतदार संघातील ग्राम पंचायत निवडणुक निकाल

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
(मा. अजित पवार गट)
१) गैबीनगर तांडा
२) बोरगांव थडी
३) गोपत पिंपळगांव
४) सेलू
५) हिंगणगांव
६) ढालेगांव
७) कांबी मजरा
८) गोळेगांव
९) सिंदफणा चिंचोली
१०) वाहेगांव (आम्ला)
११) औरंगपूर कुकडा
१२) गोंदी खु. (बिनविरोध)
१३) बालानाईक तांडा (बिनविरोध)
१४) टाकरवण ता. माजलगाव
१५) तालखेड ता. माजलगाव
१६) बाभुळगाव ता. बीड
शिवसेना
(उबाठा)
१) उमापूर
२) राहेरी
३) भेंड खु.
४) आगरनांदर
५) तळवट बोरगांव
६) पांढरी
७) रामपूरी
८) रोहितळ
भाजपा
१) पाडळसिंगी
२) चकलांबा
३) संगम जळगांव
४) शेकटा
५) काठोडा
भाजपा - शिवसेना (युती)
१)भेंडटाकळी
२)पिंपळगांव कानडा
३)रसुलाबाद
अपक्ष
१) बेलगांव
२) कटचिंचोली ३) तांदळा
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)
१) उक्कडपिंप्री
बी आर एस
१)रेवकी

**प्रतिनिधी** । बीड

बीड : जिल्ह्यातील १५८ ग्रामपंचायतीची रणधुमाळी सुरू होती. काल मतदान झाले. आज प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालयात मतमोजणीला सुरूवात झाली. बीड /शिरूर मतदारसंघात एकूण १७ ग्रा.पं.निवडणूक झाली. यामध्ये जयदत्त क्षीरसागरांचे वर्चस्व दिसून आले. बीड मतदारसंघातील सर्वात मोठी ग्रामपंचायत समजली जाणारी नाळवंडी या ग्रामपंचायतीवर डॉ.योगेश क्षीरसागरांचा दणदणीत विजय झाला.तर आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे ३ ग्रामपंचायती आल्या.बीड मतदारसंघात इतर कोणत्याही पक्षाला खाते खोलता आले नाही. त्यामुळे पुन्हा बीड मतदारसंघावर क्षीरसागरांचे वर्चस्व पहायला मिळाले.

बीड मतदार संघातील एकूण १७ ग्रामपंचायत निवडणुकीचे निकाल हाती आले असून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटाने चांगलीच सरशी मारली आहे बीड आणि शिरूर तालुक्यातील दहा ग्रामपंचायत वर माजी मंत्री क्षीरसागर गटाने वर्चस्व मिळवले आहे बीड मतदार संघातील १७ ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये दहा ग्रामपंचायत मध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर गटाने विजय मिळवला असून बीड तालुक्यातील चार आणि शिरूर तालुक्यातील सहा ग्रामपंचायतच्या निकालात मोरगाव लिंबाजीराव जाधव, घोडका राजुरी बारकूबाई चंद्रसेन घोडके, लक्ष्मी आई तांडा अनिता राजेंद्र राठोड, वासनवाडी सुदामती सतीश शिंदे, पाडळी गहिनीनाथ पाखरे, हिवरसिंगा ज्योती विजय शिंदे, तागडगाव सुरेखा नवनाथ सानप,मालकाची वाडी मच्छिंद्र चव्हाण,खांबालिंबा बालाजी गित्ते,आर्वी मीरा यादव यांचा दणदणीत विजय झाला असून या ग्रामपंचायत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ताब्यात आल्या आहेत सर्व विजयी उमेदवारांचे स्वागत जेष्ठ नेते जगदीश काळे,विलास बडगे,मुखींद लाला,ऍड शेख खाजा,सुभाष क्षीरसागर, अरुण बोगांणे,अंकुश राठोड,चंद्रकांत पेंढारे,चिमाजी वाघमारे,डॉ अरुण भस्मे यांनी केले

बीड मतदार संघातील निवडणूक झालेल्या १७ ग्रामपंचायत पैकी १० ग्रामपंचायत मध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर गटाने विजय मिळवला असून बीड तालुक्यातील चार आणि शिरूर तालुक्यातील सहा ग्रामपंचायतच्या निकालात मोरगाव लताबाई लिंबाजीराव जाधव, घोडका राजुरी बारकूबाई चंद्रसेन घोडके, लक्ष्मी आई तांडा अनिता राजेंद्र राठोड, वासनवाडी सुदामती सतीश शिंदे, पाडळी गहिनीनाथ पाखरे, हिवरसिंगा ज्योती विजय शिंदे, तागडगाव सुरेखा नवनाथ सानप, मालकाचीवाडी मच्छिंद्र चव्हाण, खांबालिंबा बालाजी गिते, आर्वी मीरा यादव यांचा दणदणीत विजय झाला असून या ग्रामपंचायत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ताब्यात आल्या आहेत. सर्व विजयी उमेदवारांचे स्वागत जेष्ठ नेते जगदीश काळे, विलास बडगे, मुखींद लाला, ॲड.शेख खाजा, सुभाष क्षीरसागर, अरुण बोंगाणे, अंकुश राठोड, चंद्रकांत पेंढारे, चिमाजी वाघमारे, डॉ.अरुण भस्मे यांनी केले.आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे बाळवाडी,बेडकुचीवाडी,ढेकणमोहा तांडा,लक्ष्मीआई तांडा या ग्रामपंचायत आल्या. यामध्ये बेडुकवाडी सरपंचपदी अश्विनी दादासाहेब खिंडकर ७७ मतांनी विजयी झाल्या.ढेकणमोहा तांडा सरपंचपदी दया पवार तर बीड तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतीपैकी नाळवंडीच्या सरपंचपदी राजेंद्र राऊत, पोखरीघाटच्या सरपंचपदी बिभीषण मुळीक, मोरगावच्या सरपंचपदी लिंबाजीराव जाधव यांची निवड झाली आहे. निकालानंतर नवनिर्वाचित सरपंच, सदस्यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अभिनंदन केले आहे.

## केज तालुक्यातील ९ ग्रामपंचायतींचे निकाल जाहीर

### नांदूरघाटमध्ये संतोष हंगेंना झटका; आडसची ग्रा.पं. आडसकरांकडे

**प्रतिनिधी** । केज

केज : ग्रामपंचायतसाठी काल मतदान झाल्यानंतर आज सकाळपासून त्या त्या तहसील कार्यालयात मतमोजणीला सुरुवात झाली. केज तालुक्यात २४ ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या, दुपारपर्यंत नऊ ग्रामपंचायतींचे निकाल हाती आले. नांदूरघाटच्या ग्रामपंचायतमध्ये सुनिता युवराज जाधव या सरपंचपदासाठी विजयी झाल्या. यात माजी जि.प. सदस्य संतोष हंगे यांना चांगलाच झटका बसला असून त्यांचा पॅनल पराभूत झाला. तर आडसची ग्रामपंचायत रमेश आडसकर यांच्या ताब्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी काल मतदान झाल्यानंतर आज सकाळपासून मतमोजणीला सुरुवात झाली. केज तालुक्यातील मतमोजणी तहसील कार्यालयामध्ये झाली. २४ ग्रामपंचायतींपैकी ९ ग्रामपंचायतींचे निकाल हाती आले. संतोष हंगे यांनी नांदूरघाटची ग्रामपंचायत जिंकण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावली, मात्र यात त्यांचा पराभव झाला. सरपंचपदी सुनिता युवराज जाधव या निवडून आल्या. युसुफवडगाव ग्रामपंचायत बजरंग सोनवणे यांच्या ताब्यात आली असून सरपंचपदासाठी सुलोचना महेश गायसमुद्रे या निवडून आल्या. आडसवर रमेश आडसकर यांचेच वर्चस्व राहिले. योगेश्वरी व्यंकट देशमुख या सरपंचपदासाठी निवडून आल्या. होळची ग्रा.पं.सुद्धा आडसकरांच्या ताब्यात आली. अश्विनी सुरेश शिंदे या विजयी झाल्या. मुळेगावमधून बाळासाहेब लाड, माळेगावमधून रोहीणी गव्हाणे, नायगावमधून गितांजली खोडस, कोल्हेरवाडीमधून प्रमिला मिसाळ आणि सासुरामधून गोविंद पाळवदे हे सरपंचपदासाठी निवडून आले आहेत.

### वडझरीच्या निकालानंतर दोन सानपांच्या गटात मारामारी

**प्रतिनिधी** । पाटोदा

पाटोदा : वडझरी ग्रामपंचायतीसाठी काल मतदान झाल्यानंतर आज सकाळी मतमोजणीला सुरुवात झाली. या वेळी भाजपाचे संजय सानप यांच्या गटाचा विजय झाला. विजय उत्सव सुरू असताना संजय सानप व त्यांचे विरोधक अनुरथ सानप हे आमने-सामने आले. या दोन्ही गटात तुंबळ हाणामारी झाली. त्या दरम्यान पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. या मारामारीमुळे काही काळ छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गोळीबाराची अफवाही पसरली होती.

वडझरी ग्रामपंचायतीसाठी भाजपाचे संजय सानप आणि धस यांच्या गटाचे अनुरथ सानप यांच्या गटात लढत झाली. काल वडझरी या ठिकाणी मतदान झाल्यानंतर आज सकाळी पाटोदा तहसीलमध्ये मतमोजणी झाली. या दरम्यान भाजपाचे संजय सानप यांच्या गटाच्या ताब्यात ग्रामपंचायत आली. सानप यांच्या गटाने विजय उत्सव साजरा करत छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात आले असता त्याठिकाणी अनुरथ सानप यांच्या गटाचे आणि संजय सानप यांच्या गटाची तु तु मैमै होत मारामारी सुरू झाली. या वेळी काठीने आणि लाथाबुक्क्यांनी एकमेकांना मारामारी केली. त्या दरम्यान पोलिसांनी हस्तक्षेप करत सौम्य लाठीमार केला.

## नेकनूरमध्ये सत्ता परिवर्तन



### धनंजय मुंडेंचे खंदे समर्थक नारायण शिंदेंकडे एकहाती सत्ता



**प्रतिनिधी** । नेकनुर

नेकनूर : नेकनूर ग्रामपंचायत गेल्या दहा वर्षांपासून भारतीय जनता पार्टीकडे होती मात्र या पंचवार्षिकमध्ये नेकनूरकरांनी सत्ता परिवर्तन करत एकहाती ग्रामपंचायत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गटाकडे दिली आहे. सरपंचपदी अनिता सुंदर लांडगे यांची निवड झाली आहे.

गेल्या दहा वर्षांपासून नेकनूरमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता होती. यावर्षी येथे तिरंगी लढत झाली. त्यामध्ये अजितदादा गटाकडून सरपंचपदासाठी उभा राहिलेल्या अनिता सुंदर लांडगे यांची सरपंचपदी निवड झाली आहे त्याचबरोबर मुकुंद काळे, मुजीब अत्तार, प्रकाश राऊत, सचीन शिंदे, सय्यद तौसिफ बबलू, जयदीप काळे, सय्यद साजेद अली बाबुभाई, शेख इजहारोद्दीन जहागीरदार, सायली जितेंद्र होमकार आणि शिवाजी शिंदे हे अजितदादा पवार गटाकडून सदस्य म्हणून निवडून आले आहेत.

तर भारतीय जनता पक्षाच्या पॅनलला दोन सदस्यांवर समाधान मानावे लागले. त्यामध्ये अशोक शिंदे आणि चक्रधर शिंदे यांचा विजय झाला आहे. तिसरे पॅनल शिवसंग्राम आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) होते. यामध्ये शेख अरशद राजाभैय्या, सय्यद नदीम मंडोला आणि सायमा फेरोज पठाण यांची सदस्य म्हणून निवड झाली तर नेकनूरकरांनी तीन अपक्ष सदस्यांनाही निवडून दिचले आहे. त्यामध्ये सय्यद रहीमभाईआणि जय निर्मळ यांची वर्णी लागली.

## भुजबळांनी केली जाळपोळीच्या घटनास्थळाची पाहणीसनराईज हॉटेलसह क्षीरसागरांच्या बंगल्याला भेट

**प्रतिनिधी** । बीड

बीड : ३० ऑक्टोबर रोजी बीड शहरात जाळपोळ आणि दगडफेकीची घटना घडली. या जाळपोळीत आमदारांसह लोकप्रतिनिधींचे घरे जाळण्यात आले. समता परिषदेचे सुभाष राऊत यांच्या हॉटेलला आग लावण्यात आली होती. सदरची घटना गंभीर असून आज कॅबिनेटमंत्री छगन भुजबळ यांनी बीडमध्ये डेरेदाखल होत घटनास्थळांची पाहणी केली. या वेळी उपस्थितांनी त्या दिवशी बीड जळत असताना पोलिसांनी हातावर हात ठेवून जे होते ते पाहत राहिल्याची तक्रार केली. यावर भुजबळांनी पोलीस अधिक्षकांना जाब विचारला.



आज सकाळी छगन भुजबळ हे संभाजीनगर येथून बीडमध्ये डेरेदाखल झाले. संभाजीनगर रोडवर असलेल्या सुभाष राऊत यांच्या सनराईज हॉटेलला भेट दिली.३० ऑक्टोबर रोजी मराठा आंदोलनाच्या आड हिंसक प्रवृत्तीच्या लोकांनी सदरची हॉटेल पेटवून दिली होती. या जाळपोळीत हॉटेलचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर भुजबळ थेट क्षीरसागरांच्या घरी आणि कार्यालयावर गेले. त्याठिकाणी त्यांनी पाहणी केली. या वेळी उपस्थितांनी जेव्हा घटना घडत होती तेव्हा पोलीस काहीच करत नव्हते, असं म्हणत पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला. या वेळी भुजबळांनी जिल्हा पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांना चांगलेच झापले. पुढे भुजबळ माजलगावसाठी रवाना झाले. बीडमध्ये भुजबळांसोबत समता परिषदेचे सुभाष राऊत, योगेश क्षीरसागर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### उपस्थितांकडून भुजबळांना पोलिसांच्या निष्क्रियतेवर सवाल



गुन्हे मागे घेवून जमणार नाही-
छगन भुजबळांनी ठामपणे सांगितले

आरंभ

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)



# अंबाजोगाईत वाहतूक कोंडीने डोकेदुखी
# नगर पालिका व पोलिस प्रशासनाकडून दुर्लक्ष

**अंबाजोगाई : शहरात नेहमी होणारी वाहतुकीची कोंडी, अनाधिकृत व बेशिस्त वाहनांच्या पार्किंगमुळे वर्दळीच्या रस्त्यावर वाहतूक ठप्प होते. या ट्रॅफिकच्या समस्येवर उपाययोजना करून मार्ग कधी निघेल, याच्या प्रतिक्षेत नागरिक आहेत.शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मागील २० वर्षांत ट्रॅफिकचा प्रश्न मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर निर्माण होत आहे. अगोदरच अरुंद रस्ते, त्यात पुन्हा रस्त्यांच्या दोन्ही दुतर्फा होणारी दुचाकी व चारचाकी वाहनांची अनाधिकृत पार्किंग, यामुळे रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होते.पर्यायी पादचाऱ्यांना रस्त्याने चालणेही कठीण होते. यावर उपाययोजना म्हणून एकतर रस्ता रुंद करणे, वाहनाची पार्किंग एकदिवसाआड एकतर्फी करणे, वाहतूक वणवे करणे अशा उपाययोजना करता येणे शक्य आहे. मात्र नगर पालिका व पोलिस प्रशासनाकडून यावर काहीच उपाययोजना होत नाहीत.**

खासगी प्रवासी वाहतूक

बसस्थानकाच्या समोरील तहसील रोड, मागच्या बाजूचा रस्ता व पंचायत समिती रस्त्यावर, मोंढा भागात प्रवासी वाहने व मालवाहतूक वाहनांची पार्किंग असते. या पार्किंगची सोय करणे आवश्यक आहे.शहरातील वाढती ट्रॅफिक, बेशिस्त वाहनांची पार्किंग व वाढता विस्तार लक्षात घेता, स्वतंत्र ट्रॅफिक ब्रँच असणे आवश्यक आहे. शहरात जिल्हा स्तरावरचे सर्व कार्यालये आहेत. त्यात अपर जिल्हाधिकारी, अपर पोलिस अधिक्षक, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, शहर व ग्रामीण पोलिस ठाणे यासह इतर कार्यालये आहेत. तर, ट्रॅफिक ब्रँच का नाही, असाही प्रश्न आहे. गुरुवारी (ता.२) विशेष पोलिस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण एका बैठकीनिमित्त येथे आले असता उपस्थित राजकीय पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी शहरातील ट्रॅफिकचा प्रश्न मांडला होता.

पोलिस चौकी होणार

शहरातील रविवारपेठ भागातील जुनी पोलिस चौकी सुरू करण्याची मागणीही श्री. चव्हाण यांच्याकडे केली. येत्या दिवाळीपर्यंत ही पोलिस चौकी दुरुस्त करून सुरू करण्याच्या सूचना श्री. चव्हाण यांनी पोलिस निरिक्षक श्री. घोळवे यांना केल्या.

शहरातील गुरूवारपेठ ते योगेश्वरी मंदिरमार्गे मंडीबाजार, सावरकर चौक ते मीनाताई ठाकरे चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवा मोंढा ते राजीव गांधी चौक या रस्त्यावर नेहमी वाहतूक ठप्प होते. बसस्थानक व छत्रपती शिवाजी महाराज चौक वगळता इतर ठिकाणी वाहतूक पोलिस नसतात.

रस्त्याच्या दुतर्फा फळगाडे



शहरातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा फळगाडे लागलेले असतात. याचाही अडथळा वाहतुकीला येतो.

शहरातील विविध कॉलनी, गल्ली, नगरात खासगी चारचाकी वाहनांची पार्किंगही रस्त्यावरच असते. वाहन घरात जाण्यासाठी अनेकांनी आपल्या दारात रॅंप केलेले आहेत. पण, वाहन बाहेरच पार्क केलेले असते. अनेक खासगी रूग्णालयाची वाहने बाहेर रस्त्यावरच पार्क केलेले असतात. प्रत्येकाने आपापल्या वाहनांसाठी पार्किंगची सोय स्वत: करायची, असा नियम बांधकाम परवाना घेतानाच असतो, मात्र त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही.

शहरातील वाहतुकीला शिस्त लागण्याची गरज आहे. ठिक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या बेशिस्त वाहतुकीच्या पार्किंगमुळे ज्येष्ठ नागरिक व शालेय विद्यार्थ्यांना रस्त्याने चालणेही कठीण होते. त्यामुळेच संबंधित विभागाने यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. वाढत्या रहदारीमुळे बाहेर पडण्याची इच्छा असूनही जाता येत नाही.

- रामकृष्ण पवार, सेवानिवृत्त शिक्षक

शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी स्वतंत्र वाहतूक शाखा सुरू करणार आहोत. त्यासाठी एका पोलिस उपनिरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. लवकरच त्याबाबत कार्यवाही करणार आहोत. वाहनधारकांना शिस्त लागावी, यासाठी वाहतूक शाखेचे पोलिस कार्यरत असतील.


- अनिल चोरमले, पोलिस उपअधिक्षक

शहरात नेहमी होणारी वाहतुकीची कोंडी, अनाधिकृत व बेशिस्त वाहनांच्या पार्किंगमुळे वर्दळीच्या रस्त्यावर वाहतूक ठप्प होते. या ट्रॅफिकच्या समस्येवर उपाययोजना करून मार्ग कधी निघेल, याच्या प्रतिक्षेत नागरिक आहेत.शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मागील २० वर्षांत ट्रॅफिकचा प्रश्न मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर निर्माण होत आहे. अगोदरच अरुंद रस्ते, त्यात पुन्हा रस्त्यांच्या दोन्ही दुतर्फा होणारी दुचाकी व चारचाकी वाहनांची अनाधिकृत पार्किंग, यामुळे रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होते.पर्यायी पादचाऱ्यांना रस्त्याने चालणेही कठीण होते. यावर उपाययोजना म्हणून एकतर रस्ता रुंद करणे, वाहनाची पार्किंग एकदिवसाआड एकतर्फी करणे, वाहतूक वणवे करणे अशा उपाययोजना करता येणे शक्य आहे. मात्र नगर पालिका व पोलिस प्रशासनाकडून यावर काहीच उपाययोजना होत नाहीत.

# लोअर दुधना धरणातून नदीपात्रात पाणी सोडणार

## शेतकऱ्यांना रब्बी हंगामात ज्वारी, हरभरा पिके घेता येतील

परभणी : यंदा अत्यल्प पाऊस झाल्यामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. आता शेतकऱ्यांचे सर्वस्वी रब्बी हंगामातील पिकावर अवलंबून आहे. परंतु, रब्बीसाठीदेखील जमिनीत ओल नसल्याने शेतीसाठी पाण्याची अत्यंत गरज आहे. त्यामुळे लोअर दुधना धरणातून नदीपात्रात पाणी सोडावे, अशी मागणी परभणी विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आ. डॉ.राहुल पाटील यांनी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली होती. या मागणीला यश आले असून



दोन दिवसांत लोअर दुधना धरणातून नदी पात्रात पाणी सोडले जाईल.आता रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी ही पिके घेतली जाणार आहेत. परंतु, जमिनीत ओल नसल्याने ही पिकेदेखील उगवणार नाहीत. शेतकऱ्यांना रब्बी हंगामात ज्वारी, हरभरा पिके घेता येतील. यासाठी लोअर दुधना धरणातून नदीपात्रात पाणी सोडावे अशी मागणी आ.पाटील यांनी केली होती.

# तोंडात साखर, डोक्यावर बर्फ

## जितेशने भांडवल उभे करण्यासाठी शहरातील बिल्डर्सलाही घातली गळ

औरंगाबाद : पैठण एमआयडीसीतून देशभरात हळूहळू अमली पदार्थ पोहोचण्यास सुरुवात झाली होती. मागण्या वाढल्याने पुरवठा वाढवणे आणि त्यासाठी भांडवल गरजेचे होते. पेक्स सुरू करतांना मुंबईतील बड्या व्यावसायिकाला त्याच्या मुलाला सेटल करायचे होते. म्हणून त्याने भांडवल लावले होते. मात्र, पेक्स विकल्यावर पुन्हा भांडवलाची आवश्यकता होती. त्या वेळीही एका बिल्डरने जावयाला सेटल करण्यासाठी जितेशला भांडवल दिले.

त्याचे जुने सहकारी सांगतात, जितेशकुमार हिनहोरिया म्हणजे तोंडात साखर अन् डोक्यावर बर्फ. कुठलीही गोष्ट पटवून सांगण्याची कला. त्यामुळेच भांडवलदार पुढे येत गेले व व्यवसाय पुढे जात होता. त्यातूनच संदीप कुमावत याच्या नावावर महालक्ष्मी केमिकल सुरू केली. बंद पडणारी ही कंपनी पुन्हा कोटींचे व्यवहार करू लागली, अशी चर्चा आहे.



तो कधीच कोणाला काही कळू देत नव्हता : जितेश त्याच्या क्षेत्रात पारंगत होता. मात्र, त्याचे हे ज्ञान त्याने सार्वजनिक केले नाही. कंपन्यांना कन्सल्टन्सी करणाऱ्याला ड्रग्जच्या दुनियेत जाण्याची गरज का पडली, ड्रग्ज बनवण्याचा ५०० कोटींचा कच्चा माल सापडला. त्याची बिले नसल्याने संशय बळावला. जप्त केटामाइन, मेफेड्रोन व कोकेनची कंपनीत तयार होणाऱ्या प्रॉडक्टसाठी गरज आहे का? या सगळ्याचा अद्याप उलगडा होऊ शकलेला नाही.

गुजरात कनेक्शनमधूनच झाली ड्रग्जनिर्मितीची सुरुवात गुजरात कनेक्शन जुळताच पैठणमधील कंपनीत ड्रग्जनिर्मिती सुरू झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. जितेश याच साखळचा भाग असावा. मुख्य सूत्रधार, कच्चा माल पुरवणारा नेमका कोण हे अद्याप पुढे आले नाही. सापडलेल्या रसायनांत अमली पदार्थ किती व ते ड्रग्जच आहे का, यावर अनेक गोष्टी स्पष्ट होतील, असा युक्तिवाद जितेशचे वकील गोपाल पांडे यांनी केला.

# दिल्लीतील उपक्रमांत सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयातील स्वयंसेवक सहभागी

मेरी माटी मेरा देश उपक्रमांतर्गत संकलित केलेल्या मातीचा अमृतकलश नवी दिल्लीतील 'कर्तव्यपथ' येथे झालेल्या कार्यक्रमाच्या ठिकाणी सुपूर्त केला. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांच्या उपस्थित झालेल्या ऐतिहासिक कार्यक्रमात करिता सौ. के. एस. के. (काकू) अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयातील तीस स्वयंसेवक सहभागी झाले असल्याची माहिती संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांनी दिली.

राष्ट्रीय स्तरावरील मेरी माटी मेरा देश उपक्रमांतर्गत अमृत कलश संकलन व समारोप समारंभ कर्तव्य पद, नवी दिल्ली येथे दि.३१.१०.२०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी सलंग्नीत असलेल्या सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे (३०) स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एम. चक्रे, सौ. डॉ. पी. ए. गायकवाड सहभागी




झाले होते.

राष्ट्रीय सेवा योजना राज्य सल्लगार राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे व पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सदानंद भोसले यांनी या उपक्रमाचे नियोजन केले होते. तसेच डॉ. एस. एस. मोरे विद्यार्थी कल्याण अधिकारी, व.ना.म.कृ.वि.परभणी, आणि संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांच्या मुळे या ऐतिहासिक कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाल्याबद्दल सर्वांचे आभार.

# वै.श्रीधरनाना उत्तरेश्वर पिंप्रीकर महाराज यांना अ.भा.वारकरी मंडळाची श्रद्धांजली

परळी ।प्रतिनिधी

वारकरी सांप्रदायातील शांतीब्रह्म वै.श्रीधरनाना उत्तरेश्वर पिंप्रीकर महाराज यांचे आज रविवार दि.५ नोव्हेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. वै.श्रीधरनाना उत्तरेश्वर पिंप्रीकर यांना अ.भा.वारकरी मंडळाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



वै.ह.भ.प.उत्तरेश्वर महाराज चाकरवाडीकर यांचे कनिष्ठ बंधू वारकरी सांप्रदायातील शांतीब्रह्म वै.श्रीधरनाना उत्तरेश्वर पिंप्रीकर यांचे आज निधन झाले. यामुळे संपूर्ण वारकरी सांप्रदायावर शोककळा पसरली आहे. यानिमित्त आज रविवारी शक्तीकुंज वसाहत येथे अ.भा.वारकरी मंडळाचे राज्य उपाध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या उपस्थितीत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी बोलतांना श्री कोकाटे म्हणाले की, वै.श्रीधरनाना उत्तरेश्वर पिंप्रीकर महाराज यांच्या अकाली जाण्याने संपूर्ण वारकरी सांप्रदायावर शोककाळा पसरली असून अत्यंत मनमिळावू व सर्वांशी प्रेमाने व आपुलकीने बोलणारे व्यक्तीमत्व आपल्यातून आज निघून गेले असून ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देओ अशी प्रार्थना केली. या वेळी श्रद्धांजली वाहातांना अ.भा.वारकरी मंडळाचे सर्व पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



**अडत व्यापारी शिक्षण संस्था देगलूर संचलित..देगलूर महाविद्यालय देगलूर चे शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष आणि कार्यकुशल व्यक्तिमत्व आदरणीय प्राचार्य डॉ. मोहन खताळ सर यांची वाढदिवसानिमित्त सदिच्छा भेट घेऊन देगलूर महाविद्यालयाचे उपप्राचार्य उत्तमकुमार कांबळे सर यांनी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.(छाया:- शिवकुमार बिरादार)**




जालना : राज्य शासनाकडून एस.टी. महामंडळाच्या बस प्रवासामध्ये विविध सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे बसने प्रवास करणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. मात्र, दुसरीकडे बसच्या संख्येत वाढ होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहे. यावर तोडगा म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून १३३ इलेक्ट्रिक बस खरेदी होणार असून त्या मार्च अखेरपर्यंत जिल्ह्यातील आगारांत दाखल होणार आहेत.

बसचा प्रवास, सुखाचा प्रवास अशी ओळख महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची आहे. शिवाय ग्रामीण भागात दळणवळणाचे सामान्यांसाठी महामंडळाची एसटी हा एकच पर्याय आहे. त्यात ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ये-जा करण्यासाठी बस हाच उत्तम आणि एकमेव पर्याय आहे. त्यात महाराष्ट्र शासनाने बस प्रवासाच्या तिकीट दरात विविध सवलती दिल्या आहेत. यात प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना तिकीटावर पन्नास टक्के सवलत, विद्यार्थ्यांसाठी मासिक पास योजना आहे. यामुळे बसच्या प्रवासी संख्येत मोठी वाढ झाली आहे.

# कुणबी जातीचे पुरावे तपासणीसाठी समिती गठीत, जिल्हाधिकारी कार्यालयात 'विशेष कक्ष' स्थापन

मराठवाड्यात कुणबी नोंदी शोधण्यासाठी जी मोहीम राबविण्यात आली त्याच धर्तीवर आता संपूर्ण राज्यभर ही प्रक्रिया मिशन मोडवर राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यात सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मराठा-कुणबी नोंदी शोधण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली असून यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर समित्या गठित करण्यात आल्या असून जिल्हाधिकारी कार्यालयात 'विशेष कक्ष' स्थापन करण्यात आला आहे.

या विशेष मोहिमेत तपासणी केलेली कागदपत्रे व नोंदी मिळालेली कागदपत्रे याची निर्दोष यादी तयार करण्यासाठी संपूर्ण नाशिक महसूल प्रशासन जिल्हाधिकारी जलज शर्मा, अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र



वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार आणि महसूल कर्मचारी यांच्या समन्वयातून जलदगतीने होणार आहे

राज्यभरातील या कामाच्या संनियत्रणासाठी राज्य शासनाने मंत्रालयस्तरावर देखील अपर मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यकक्षा आता राज्यभर वाढविण्यात आली आहे.

त्याचबरोबर मागासवर्ग आयोगाला इम्पॅरिकल डेटासाठी आवश्यक ती माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर कार्यवाही करून उपलब्ध करून द्यावी. तसेच राज्य शासन मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात गांभीर्याने कार्यवाही करीत आहे. त्यासाठी आता मराठवाड्यासह राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत:हून कुणबी नोंदी तपासण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम हाती घ्यावी, त्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी आणि त्यांच्या नियंत्रणाखाली कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून द्यावी. त्यांना आवश्यक ते मनुष्यबळ, साधनसामुग्री देखील तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

या अनुषंगाने नाशिक विभागीय आयुक्त राधकृष्ण गमे यांनी नाशिक विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये यासंदर्भात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मराठा-कुणबी नोंदी शोधण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली असून यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात 'विशेष कक्ष' स्थापन करण्यात आला आहे.

# दिवाळीत खाद्यतेल स्वस्त, मध्यमवर्गीयांना दिलासा

पुणे : मगील वर्षीच्या तुलनेत सूर्यफूल पाम, सोयाबीन तेलाची आवक नियमित सुरू आहे. त्याचप्रमाणे खाद्यतेलाची आयात देखील वाढलेली आहे. इस्रायलमधील युद्धजन्य परिस्थिती, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खाद्यतेलाला मागणी कमी झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून खाद्यतेलाच्या दरात टप्प्याटप्प्याने घट झाली. याचा सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला असल्याचं चित्र आहे. त्यामुळे यंदाची सर्वसामान्यांची दिवाळी गोड होणार यात शंका नाही. सध्या सुरु असलेल्या महागाईमुळे सर्वसामन्यांच्या खिशाला चांगलीच कात्री बसत असल्याचं चित्र आहे. त्यातच खाद्यतेलांचे दर कमी झाल्यामुळे सामान्य नागरिकांना आणि गृहिणींना देखील कीहीसा दिलासा मिळाल्याचं पाहायला मिळतयं.

नुकतीच घरगुती गॅस सिलेंडरच्या दरामध्ये १०० रुपयांनी वाढ झाली होती. त्यामुळे गृहिणींचं बजेट पुन्हा एकदा कोलमोडलं होतं. पण आता खाद्यतेलाच्या किंमतींमध्ये घट झाल्यानंतर काहीसा दिलासा गृहिणींना मिळाला आहे.

दर कमी होण्याचं कारण काय?

मागील वर्षी खाद्यतेलांचे दर हे अधिक प्रमाणात होते. पण यंदा हे दर ३० ते ३५ टक्क्यांना कमी झाल्याचं चित्र आहे. परंतु शेंगदाणा तेलाचे दर जैस थेच राहिलेत. यंदा परदेशातून येणाऱ्या सूर्यफूल, पाम, सोयाबीन तेलाची आवाक ही नियमितपणे सुरु असल्याचं मुख्य कारण आहे. त्यातच खाद्यतेलाची आवाक देखील यंदाच्या वर्षात वाढल्याचं चित्र आहे. इस्रायलमधील युद्धजन्य परिस्थिती हे एक मुख्य कारण खाद्यतेलाच्या किंमतींचे दर कमी होण्यामागे दुसरं मुख्य कारण आहे. त्यातच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खाद्यतेलाला मागणी देखील कमी झालीये. त्यामुळे काही महिन्यांपासून खाद्यतेलाच्या दरात घट झाली.

# ऐन रब्बी हंगामात कृषी विक्रते संपावर विधेयकातील जाचक अटी नियम रद्द करा

आष्टी : राज्य सरकारच्या नवीन प्रस्तावित कृषी कायदा विधेयकातील काही नियम जाचक असून त्या विरोधात पुकारलेल्या राज्यव्यापी संपात सहभागी होत आष्टी तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांनी तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असून आजचा तिसरा दिवस ही तालुक्यातील सर्व कृषी दुकाने कडकडीत बंद पाळण्यात येत असुन संबंधित नियम व जाचक अटींच्या निषेधार्थ निदर्शने करत कृषी विक्रेते यांच्याकडून निषेध नोंदवण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नवीन प्रस्तावित कृषी कायदा विधेयक क्रमांक ४०,४१,४२,४३, व ४४ मधील कृषी विक्रेत्यांना बाधा आणणार्या जाचक नियमांना विरोध करण्यासाठी, व प्रस्तावित कायदे रद्द करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व कृषी सेवा केंद्र ऐन रब्बी हंगामात येत्या दोन ते चार नोव्हेंबर असा तीन दिवसाचा बंद पाळून राज्य शासनाच्या कायद्याचा निषेध नोंदवला आहे. या संदर्भात आष्टी तालुका कृषी निविष्ठा विक्री संघटना आष्टी, यांनी दिनांक ३० ऑक्टोबर रोजी तालुका कृषी अधिकारी आष्टी, तसेच गट विकास अधिकारी पंचायत समिती आष्टी, तहसीलदार आष्टी, तसेच मा. आ. सुरेश धस, व मा. आ. बाळासाहेब आजबे यांना निवेदन दिले आहे.राज्य सरकारने नवीन प्रस्तावित कायद्यात कृषी दुकानांसंदर्भात काही जाचक अटी आणि नियम लागू करण्याचे ठरवले असल्याचे कृषी सेवा केंद्र चालकांचे म्हणणे आहे. संबंधित जाचक अटी आणि नियमांच्या निषेधार्थ संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व कृषी केंद्र दोन ते चार नोव्हेंबर या कालावधीत बंद ठेवण्यात आली आहेत.आष्टी तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांचाही यात समावेश आहे.राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या पाच विधेयका विरोधात हा संप असून या विधेयकातील तरतुदी कृषी विक्रेत्यांसाठी अडचणीच्या आहेत.विक्रेत्यांना सीलबंद तसेच पॅकिंग केलेल्या कृषी निविष्ठांच्या दर्जाबाबत दोषी धरण्यात येवू नये, असे म्हणणे आहे. या विधेयकाचा फेरविचार करावा महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या जाचक अटी रद्द कराव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या मागणीसाठी राज्य सरकारचा निषेध नोंदवत निदर्शने करण्यात आली यावेळी आष्टी तालुका कृषी संघटना आष्टी तालुका अध्यक्ष - अशोक तळेकर सचीव - अमोल झगडे, संपत शेळके विक्रम नरवडे प्रवीण चौधरी अनिल मेहेर महेश जोशी कीरण पठारे बुवासाहेब महाजन सुरेश खेडकर गणेश बळे तुषार राऊत संभाजी रेडेकर संपत भोसले शरद मुटकुळे धनंजय खिलारे बाळासाहेब साळवे कृष्णा मुळे अनिष राजमाने ऋषिकेश बोडखे आजय धोंडे काका पाथरकर सतीष तोतरे अमोल तळेकर औदूंबर निभोरे केतन पोकळे हरीदास भवर यशपाल रेडेकर रवींद्र झीजर्के गणेश आजबे विकास पवार विवेक देवकर भाऊसाहेब करांडे कैलास गव्हाणे रामेश्वर खाकाळ शिवलाल कटारीया अनील करांडे सचीन पुणेकर बालाजी वारंगुळे आदी विक्रेते उपस्थित होते.





# दिल्लीकरांच्या दिवाळीस वैशालीच्या सुरेल स्वरांनी सुरुवात

**शरद पौर्णिमेची शीतलता दिल्लीकरांकरिता दिवाळीची चाहूल घेऊन येते,महाराष्ट्रा प्रमाणे दिल्लीत 'ऑक्टोबर हिट' चा तडाखा जाणवत नाही. दिल्लीत त्याऐवजी चंद्र कले कलेने आल्हाददायक वातावरण वाढवत असतो.**

**दिल्ली मराठी प्रतिष्ठान गेली सात वर्षे सातत्याने यशस्वीपणे हवेतील सुखद गारव्या सोबत दिवाळी**

पहाटचा कार्यक्रम आणि दिग्गज गायकांची इंडिया गेट आणि सेंट्रल पार्कच्या साक्षीने रंगलेल्या मैफिलीचे आयोजन करत आला आहे.

# राज्यातील ग्रामपंचायतींनी वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी १० हजारांची तरतूद करावी

जळगाव : सोशल मीडियाच्या काळातही वृत्तपत्रे तग धरून आहेत, याचाच अर्थ काही प्रमाणात खप कमी झाला असला तरी विश्वासार्हता मात्र कायम टिकून आहे. वृत्तपत्र व्यवसायाला अधिक बळकटी देण्यासाठी संपूर्ण राज्यातील ग्रामपंचायतींनी वृत्तपत्र खरेदीसाठी वार्षिक आराखड्यात १० हजार रुपयांची तरतूद करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

उत्तर महाराष्ट्र दौऱ्यात जळगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत वसंत मुंडे यांनी पत्रकारांचे हक्क, वृत्तपत्रांचे अर्थकारण अशा विविध मुद्यांवर चर्चा केली. पुढे बोलताना मुंडे यांनी सांगितले, वृत्तपत्रे टिकणे काळाची गरज आहे. यासाठी ग्राम पातळीवरही व्यापक प्रयत्न करणे गरजेचे आहे. राज्यातील ग्रामपंचायतींनी वृत्तपत्र खरेदीसाठी आपल्या वार्षिक आराखड्यात १० हजार रुपयांची तरतूद करण्याची गरज आहे. जळगाव शहरातील पद्मावती विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. पत्रकार परिषदेला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष प्रवीण सपकाळे, खानदेश अध्यक्ष किशोर रायसाकडा, प्रमोद सोनवणे,भगवान मराठे, योगेश सैतवाल,सुरेश पवार,भूषण महाजन,दीपक सपकाळे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

मंत्री गिरीश महाजन यांना शिष्टमंडळ भेटणार : वसंत मुंडे

संपूर्ण राज्यातील ग्रामपंचायतींनी वृत्तपत्र खरेदीसाठी वार्षिक आराखड्यात १० हजार रुपयांची तरतूद करावी, ही मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ लावून धरणार असून याबाबत लवकरच एक शिष्टमंडळ राज्याचे ग्राम विकासमंत्री गिरीष महाजन यांना भेटणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



# ५० वर्षीय महिलेच्या मृत्यू प्रकरणी अखेर वकील जावायाला अटक

## शवविच्छेदन अहवालावरून पोलीसांनी केली कारवाई

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

२१ ऑक्टोबर रोजी रात्री १०:३० वाजता शहरातील अजमेर नगर भागात राहणाऱ्या एका ५० वर्षीय महिलेच्या मृत्यू प्रकरणी अखेर शहर पोलिसांनी सदरील महिलेच्या शवविच्छेदन अहवालावरुन तिच्या जावायाला ३ नोव्हेंबर रोजी रात्री अटक केली. या प्रकरणीच्या अधिक तपासात इतर आरोपी निष्पन्न होतील असा विश्वास तपासी अधिका-यांना आहे.

शहरातील अजमेर नगर विभागात राहणा-या ऍड. शेख अलीम शेख लाल यांच्या निवासस्थानी त्यांच्या कुटुंबीयां समवेत त्यांच्या ५० वर्षीय सासू जिया समशोद्दीन काझी या राहत होत्या. जिया समशोद्दीन काझी यांचा २१ ऑक्टोबर रोजी रात्री १०:३० चे सुमारास मृत्यू झाला. ही घटना मयत जिया यांचे शहरातील महसुल कॉलनी विभागात राहणारे त्यांचे भाऊ अनिसोद्दीन खतीब यांना ऍड. शेख अलीम यांनी २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ७:०० वाजता सांगितली. सदरील मृत्यू हा -हदयविकाराच्या झटक्याने झाला असे ऍड. अलीम यांनी सांगितले असल्याचे अनिसोद्दीन खतीब यांचे म्हणणे होते. सदरील घटनेची माहिती मिळताच अनिसोद्दीन खतीब यांनी आपल्या बहिणीचा मृतदेह आपल्या महसूल कॉलनी विभागातील निवासस्थानी आणून मृत्यूनंतरचे धार्मिक सोपस्कार करुन त्यांचेवर किरमानी दर्गा परिसरातील कब्रस्तानात दफनविधी करण्यात आला. दफनविधी नंतर मयत जिया समशोद्दीन काझी यांचा मृत्यू -हदयविकाराने नाही तर इतर कारणांमुळे झाला असल्याची चर्चा अनिसोद्दीन खतीब व त्यांच्या इतर भावांच्या कानावर आल्यानंतर त्यांनी २४ ऑक्टोबर रोजी पोलीसात रीतसर तक्रार देवून जिया समशोद्दीन काझी यांचा दफनविधी केलेला मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन करण्याची मागणी केली.

सदरील मागणीची गांभिर्याने दखल घेऊन शहर पोलिसांनी तहसीलदार, वैद्यकीय महाविद्यालयातील संबंधित अधिकारी, नगर परिषदेचे कर्मचारी व तक्रारदार यांच्या उपस्थितीत दफनविधी केलेले पार्थिव बाहेर काढून वैद्यकीय महाविद्यालयाच्या शवविच्छेदन विभागात नेवून इन कॅमेरा शवविच्छेदन केले.सदरील शवविच्छेद अहवालात मयत जिया समशोद्दीन काझी यांचा मृत्यू -हदयविकाराने नाही तर तिच्या डोक्याला मार लागल्याने झाला असे नोंदवले आहे. सदरील मयत महिलेच्या डोक्याच्या कवटीला क्रॅक गेला असल्याचे एक्स रे अहवालाच्या रिपोर्ट मध्ये नोंदवले असल्याचे म्हटले आहे.

सदरील मयत जिया समशोद्दीन काझी यांच्या शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालात या नोंदी असून तिच्या व्हिसरा तपासणी अहवालात अधिकची कारणे स्पष्ट होतील असे तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.पोलिसांनी मयत जिया समशोद्दीन काझी यांचा शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालावरून शहर पोलिस स्टेशनला दि. ४ नोव्हेंबर रोजी रात्री गुरनं.४१३ दाखल केला असून या प्रकरणी मयत महिलेचा जावाई ऍड. शेख अलीम शेख लाल यास ताब्यात घेऊन त्याचेवर भादविचे कलम ३०२, १२० ब, २०१ आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.




२१ ऑक्टोबर रोजी जिया समशोद्दीन काझी या महिलेच्या मृत्यू नंतर या प्रकरणी तिच्या भावाने संशय व्यक्त करुन तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी अधिक सखोल तपास सुरु केला होता. या प्रकरणाची गांभीर्यता लक्षात घेऊन पो.नि. विनोद घोळवे यांनी तपास स्वतः कडे घेत मयत महिलेचे पार्थिव कब्रस्तानातुन काढून त्याचे शवविच्छेदन होईपर्यंत व शवविच्छेदनाचा अहवाल येई पर्यंत अत्यंत संयमाने आणि बारकाईने तपास करीत शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त होताच ऍड. शेख अलीम शेख लाल यास ताब्यात घेऊन पुढील तपास सुरु केला आहे. पोलीस तपासात मयत जिया समशोद्दीन काझी यांच्या मृत्यूची अधिकची कारणे पुढे निष्पन्न होतील. तसेच या मृत्यू प्रकरणाच्या कारणांचा उलगडा ही निश्चितपणे होईल असा विश्वास तपास पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# शेतकऱ्यांना बुरशीनाशक फवारणी करण्याबाबत केले मार्गदर्शन

बीड : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषि महाविद्यालय बीड येथील कृषिदुत अभय गुट्टे, सत्यम बीडगर, मयूर कांबळे, नरेश गीते, सुमीत काळे यांनी ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२३ - २४ अंतर्गत बीड जिल्ह्यातील बार्शी नाका गावातील शेतकऱ्यांना बुरशीनाशक फवारणी करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. ङ्गफवारणीच्यावेळी आवश्यक ती काळजी न घेतल्याने होणारी विषबाधा टाळण्यासाठी बुरशीनाशके उत्पादक कंपन्यांनी दिलेले फवारणी संरक्षण कीट शेतकऱ्यांनी वापरावे असे कृषीदुतांनी प्रात्यक्षिकासाठी वनस्पती रोगनिदान लाभले.




बुरशीनाशकांसोबत दिलेले २४ लीफलेट अवश्य वाचावे असे लीफलेट अवश्य वाचावे असे सांगितले. फवारणी संरक्षण कीट न वापरल्याने होणाऱ्या तीव्र आजारांची लक्षणे जसे की, केस गळणे, डोळे लाल होणे, डोकेदुखी, उलटी होणे, चक्कर येणे तसेच कर्करोग, अस्थमा, त्वचेचे रोग असे गंभीर आजार होऊ शकतात अशी सविस्तर माहिती दिली. याशास्त्र विभागाचे विषयतज्ञ प्रा. सानप सर यांचे मार्गदर्शन लाभले.ङ्गतसेच या प्रात्यक्षिकाकरिता विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अदितीजी सारडा, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम तांबे, प्राचार्य श्री श्यामजी भुतडा, कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप मोरे, कार्यक्रम अधिकारी व विषयतज्ञ आणि महाविद्यालयाचा इतर प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

# दिवाळीनिमित्त उमेद महिला बचत गटाचे दिवाळी फराळ व साहित्य विक्री व प्रदर्शन

बीड ।प्रतिनिधी

दिवाळी म्हटलं की फराळ आलाच. सर्वच ठिकाणी फराळ बनवण्याची लगबग सुरू आहे. या संधीचा फायदा घेण्यासाठी बीड जिल्यातील उमेद अभियानातील बचत गटहीपुढे सरसावले आहेत. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत बीड जिल्ह्यातील स्वयंसाहायता समूह उत्कृष्ट उत्पादने तयार करीत आहेत. दिवाळी सणानिमित्त मोठ्या प्रमाणात भेटवस्तू व इतर साहित्य आदान प्रदान केल्या जातात. यामध्ये फटाके वगळता बचत गटांनी उत्पादित केलेला सुकामेवा, हस्तकला साहित्य, फराळाचे पदार्थ व चॉकलेट, पणत्या, आकाश कंदील भेटवस्तू म्हणून दिल्या जात असतात.या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी बीड जिल्हा परिषद प्रांगणात दिनांक ०६ नोव्हेंबर ते ०९ नोव्हेंबर २०२३ सकाळी १० ते रात्री ९.०० या कालावधीत दिवाळी फराळ व साहित्य विक्री प्रदर्शन भरविण्यात येत आहे.या दिवाळी फराळ व साहित्य विक्री प्रदर्शनातील स्टॉलवर बीड वासीयांना दिवाळी फराळ व दिवाळीत आवश्यक असणारे साहित्य मिळू शकणार आहे. यामध्ये प्रामुख्याने चकली, लाडू,करंजी, शंकरपाळी, अनारसे, शेव, चिवडा या दिवाळी पदार्थांसह लोणची, पापड, विविध मसाले, तयार पिठे, शेवया, कुरड्या हे नेहमीचेच खाद्य पदार्थही उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.२०-२५ स्वयंसहायता समूह यांनी उत्पादित केलेल्या उत्पादनाची विक्री व प्रदर्शन करण्यासाठी स्टॉलची उभारणी करण्यात आलेली आहे.याशिवाय दिवाळीसाठी आवश्यक असलेल्या पणत्या,रांगोळी, दीपमाळा, आकाशकंदील या वस्तूंसह घरगुती वापरातील विविध वस्तू व आयुर्वेदिक उत्पादने जसे की उटणे, उपटन, आयुर्वेदिक साबणअगरबत्ती, ज्वेलरी व सौंदर्य प्रसाधने आदी मिळू शकणार आहेत .

### बचत गट महिलांचा उत्साह वाढवा - सीईओ अविनाश पाठक

दिवाळी'महोत्सव-२०२३' कार्यक्रमास उपस्थित राहून बचत गट महिलांचा उत्साह वाढवावा. दिवाळी महोत्सवांमध्ये खरेदी करण्यास प्रोत्साहित करावे. बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना. उत्पादनांना व्यासपीठ व बाजारपेठ उपलब्ध व्हावे यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. - श्री अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड



# दगाफटका केला तर..

## जरांगे पाटील यांनी सांगितला पुढचा प्लॅन

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी नऊ दिवस आमरण उपोषण केल्यानंतर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे. याच दरम्यान त्यांनी पुन्हा राज्य सरकारला इशारा दिला आहे. दगाफटका केला तर आमची तयारी पूर्ण असल्याचं ते म्हणाले आहेत. तसेच लवकरच ते राज्यभरात दौरा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.क्युरेटिव्ह याचिका हा पूर्ण उपचार नाही, तो फक्त मलम लावण्याचा प्रकार आहे. त्यामुळे आम्हाला सरसकट ओबीसीतून कुणबी प्रमाणपत्र द्यावे हीच आमची मागणी आहे. याचाच विचार राज्य सरकारने करावा, असेही जरांगे पाटलांनी सांगितलं आहे. जरांगे म्हणाले, ''सरकारवर विश्वास असला तरी, आम्ही दुसरी बाजू भक्कम करतोय. दगा फटक्याची भीती आहे. त्यामुळे आंदोलनाची तयारी ही आमची सुरू आहे. येत्या एक तारखेपासून गावागावात साखळी उपोषण सुरू होईल. ज्या गावात आधीपासून आहे, तिथे राहीलच आणि नव्याने गावांचा समावेश होईल.''

वकील गुणरत्न सदावर्ते यांच्याबद्दल त्यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, ''गुणरत्न सदावर्ते बाबत आम्हाला बोलायचं नाही. त्यांना जे वाटतं ते करू द्या, आम्हाला कुणाचेही वाईट चिंतायचे नाही.'' मनोज जरांगे पाटील म्हणाले, ''मुंबई बैठक आमंत्रण आले आहे. मात्र मी रुग्णालयात असल्याने जाऊ शकणार नाही. उलट मलाच इथं शिष्टमंडळ भेटायला येणार आहे.''

# चिंचाळा-देसूर रस्त्यावरील पुलासाठी ५० लक्ष रुपये मंजूर

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी मतदार संघाचे लोकप्रिय आमदार बाळासाहेब आजबे यांच्याकडून मतदार संघातील विकास कामांना गती मिळाली आहे .सरपंच पंडित आण्णा पोकळे यांच्या मागणी वरून चिंचाळा- देसुर रस्त्यावरील चिंचाळा गावालगत असलेल्या नदीवरील पुलासाठी ५० लक्ष रुपये मंजूर करून दळणवळणाचा मार्ग अधिक सुखकर करण्याचा आमदार बाळासाहेब आजबे यांचा प्रयत्न सफल झाला आहे. आष्टी तालुक्यातील चिंचाळा- देसूर हा पंधरा गावांचा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे .चिंचाळा येथील चार वसत्यावरील शाळेतील विद्यार्थी , वृध्द यांना हा पुल अत्यंत गरजेचे चा असल्याने या ठिकाणी पुलाची समस्या अनेक वर्षांपासून होती सरपंच पंडित आण्णा पोकळे यांच्या मागणी वरून आमदार बाळासाहेब आजबे यांनी चिंचाळा गावात असणाऱ्या नदीवरील पुलासाठी ५० लाख रुपये मंजूर करून सरपंच पंडित आण्णा



पोकळे यांची मागणी पूर्ण केली आहे. आमदार बाळासाहेब आजबे यांनी हा महत्त्वाचा प्रश्न सोडवल्याबद्दल चिंचाळा गावचे सरपंच पंडित अण्णा पोकळे, सदस्य बाळासाहेब पोकळे, सदस्य ज्ञानेश्वर पोकळे, सदस्य अनिल पोकळे यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी व ग्रामस्थांनी आमदार बाळासाहेब आजबे यांचे जाहीर आभार व्यक्त केले आहेत.

आदित्य कृषि महाविद्यालयातील कृषिदूतांनी दिली

# राजगुरुनगर येथील कांदा व लसूण संशोधन संचालनालयाला भेट

बीड :- आदित्य कृषि महाविद्यालयातील चौथ्या वर्षातील कृषि कार्यानुभवचे कृषिदूत यांनी राजगुरुनगर येथील भारतीय कृषी संशोधन परिषद कांदा व लसूण संशोधन केंद्राला भेट दिली आणि तेथे विविध प्रात्यक्षिक करण्याचे प्रशिक्षण घेतले. यावेळी कृषिदूतांना मार्गदर्शन करण्यासाठी राजगुरुनगर येथील कांदा व लसून संशोधन केंद्राचे विस्तार विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.काळे.आर.बी. यांनी यावेळी कृषिदूतांना कांदा व लसूण संशोधन केंद्राबद्दल सविस्तर माहिती दिली.

कृषिदूतांनी सर्वप्रथम डॉ.राजीव काळे यांच्यासोबत संशोधन केंद्रात एक आठवडा कोणत्या प्रकारे काम करायचे यावर चर्चा केली. त्यानंतर कृषिदूतांनी कांदा व लसणाच्या विविध जातीबद्दल सखोल माहिती घेतली. त्या किटकशास्त्र विभागाला भेट देऊन कांदा व लसूण पिकामध्ये येणाऱ्या विविध कीड व रोग ओळखून त्यावरील उपायाबद्दल सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर कृषिदूतांनी सर्व प्रकारच्या पॉलीहाऊस ला भेट दिली. कांदा व लसूण पिकासाठी आवश्यक असणाऱ्या अन्नद्रव्यांबद्दल माहिती प्राप्त केली,त्याचप्रमाणे कांदा व लसूण या पिकांच्या साठवणुकीत येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय याबद्दल अत्यावश्यक माहिती दिली.

यासाठी कृषिदूतांना राजगुरुनगर येथील कांदा व लसूण संशोधन केंद्राचे विस्तार विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.राजीव काळे तसेच आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सतीश कचरे, कृषि कार्यानुभव कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संदीप मोरे, कृषि विस्तार विभागाचे प्रमुख श्री. धावणे सर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

# ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपने मारली बाजी! मतदार राजाचा महायुतीला कौल

**प्रतिनिधी । बीड**

राज्यात आज ग्रामपंचायत निवडणुकांचा धुरळा उडाला आहे. तब्बल २ हजार ३५९ ग्रामपंचायतीचे निकाल जाहीर झाले आहे. या निवडणुकीत अनेक दिग्गजांना धक्का बसला आहे. तर अनेक दिग्गजांनी आपली प्रतिष्ठा कायम राखली आहे. आतापर्यंतच्या निकालानुसार भाजपने अनेक ग्रामपंचायतींवर विजय मिळवला आहे. तर मतदार राजाने महायुतीला कौल दिल्याचे आता पर्यन्तच्या आकडेवाडीनुसार पुढे आले आहे.

राज्यात जसे जसे निकाल पुढे येत आहे तस तसे जल्लोषाचे वातावरण वाढले आहे. भाजप नंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने वर्चस्व मिळवले आहे. यानंतर शिवसेनेच्या शिंदे गटाने बाजी मारली आहे. चौथ्या क्रमांकावर काँग्रेस तर पाचव्या क्रमांकावर राष्ट्रवादी शरद पवार गट, तर पाचव्या क्रमांकावर ठाकरे गट आहे. प्रत्येक पक्षाने आपल्या विजयाची आकडेवारी जारी केली आहे.

१२ वाजेपर्यंत लागलेल्या निकालानुसार भाजप आणि महायुतीला मतदारांनी पसंती दिली आहे. भाजपला ११३, शिंदे गटाला ७८, अजित पवार गटाला ९७, काँग्रेसला ५३, शरद पवार गटाला ४२ आणि ठाकरे गटाला ४२ आणि इतर पक्षाला ६० जागा मिळाल्या आहेत.

पुण्यात अजित पवार गटाने मारली बाजी

पुण्यात बारामती आणि मावळ तालुक्यात अजित पवार यांच्या गटाने बाजी मारली आहे. काल काटेवाडी येथे अजित पवार गटावर पैसे वाटप करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. दरम्यान, बारामती तालुक्यातील १५ तर मावळ तालुक्यातील काही ग्रामपंच्यायतीवर अजित पवार गटाने वर्चस्व मिळवले आहे. बारामती तालुक्यात भोंडवेवाडी, म्हसोबा नगर, पवई माळ , आंबी बुद्रुक, पानसरे वाडी, गाडीखेल, जराडवाडी, करंज, कुतवळवाडी, दंडवाडी, मगरवाडी, निंबोडी गावात अजित गटाने बाजी मारली आहे. मावळ तालुक्यातील डोने गावात भाजपने तर दिवड गावात अजित पवार गटाने




विजय मिळवला आहे. डोने येथे भाजपचे हृषीकेश खारेक सरपंच झाले आहे तर दिवडचे राष्ट्रवादी काँग्रेसचे गणेश राजीवडे सरपंच झाले.

पुण्यानंतर सोलापूर येथे भाजपने अनेक ग्रामपंचयातीवर सत्ता काबिज केली आहे. दक्षिण सोलापूर जिल्ह्यातील कासेगाव ग्रामपंचायतीवर भाजपने सत्ता मिळवली. येथील यशपाल वाडकर हे सरपंच म्हणून निवडणून आहे आहे. नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील नेरी ग्रामपंचायतीत भाजपने वर्चस्व मिळवले आहे. येथे भाजपच्या सुजाता सुरेश पाटील या सरपंच झाल्या आहेत. तर कामठी तालुक्यातील कवठामध्ये देखील भाजपने बाजी मारली असून सरपंचपदी निलेश डफ्रे विजयी झाले आहे. वारेगाव येथे काँग्रेसने बाजी मारली आहे. काँग्रेसच्या रत्नबाई उईके या सरपंच म्हणून विजयी झाल्या आहेत. मिरज हरिपूर ग्रामपंचायतीवर भाजपने सत्ता मिळवली आहे. सांगली जिल्ह्यात मिरज हरिपूर ग्रामपंचायतीवर भाजपने बाजी मारली आहे

# गावबंदीमुळे पंचाईत झालेल्या नेत्यांची रुग्णालयात गर्दी



**प्रतिनिधी । जालना**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी प्रभावी आणि परिणामकारक आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी दुसऱ्या टप्प्यातील आंदोलनात राजकीय नेत्यांना गावबंदी केली होती. अंतरवाली सराटीत आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी राज्यभरातील सर्वच पक्षांच्या नेत्यांनी धाव घेतली होती. परंतु चाळीस दिवसांची मुदत उलटून गेल्यानंतरही सरकारने आरक्षणा संदर्भात ठोस निर्णय घेतला नाही, यावर मनोज जरांगे चांगलेच आक्रमक झाले.

सरकारला पेलणार नाही, झेपणार नाही असे आंदोलन करत त्यांनी मंत्री, आमदार, खासदार यांना गावबंदी जाहीर केली. जरांगे यांच्या आवाहनाला असा प्रतिसाद मिळाला की पाचशेहून अधिक गावांत राजकीय नेत्यांसाठी गावबंदीचे फलक लागले. शिवाय दिसेल तिथे मराठा आंदोलक राजकीय नेत्यांचे कार्यक्रम उधळून त्यांना पिटाळून लावत होते. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यातील आंदोलनात एकाही राजकीय नेत्याला अंतरवालीत प्रवेश नव्हता.आता सरकारच्या शिष्टाईनंतर मनोज जरांगे यांनी बेमुदत उपोषण स्थगित केले आणि छत्रपती संभाजीनगरच्या गॅलेक्झी या खासगी रुग्णालयात ते गेल्या पाच दिवसांपासून उपचार घेत आहेत. ज्यांना गावबंदीमुळे अंतरवालीत जाऊन जरांगे यांना पाठिंबा दर्शवता आला नाही, त्यांनी आता रुग्णालयात गर्दी केली आहे. दररोज विविध पक्षांचे आमदार, खासदार, नेते, मंत्री आणि सामान्यांची रुग्णालयात गर्दी होत असल्याने रुग्णालय प्रशासनही हैराण झाले आहे.

# नोव्हेंबरमध्ये विद्यार्थ्यांची चंगळ!

## दिवाळी आणि छठमुळं तब्बल इतके दिवस राहणार शाळा बंद

**प्रतिनिधी । बीड**

दिवाळी हा सण संपूर्ण भारतात साजरा केला जातो. या वर्षी अमेरिकेतही दिवाळी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाणार असून या निमित्त सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दिवाळी सोबतच छठ पूजा देखील आहे. छठ पूजा सण हा प्रामुख्याने बिहार-झारखंड येथे साजरा केला जातो. बिहारमध्ये छठपूजेसाठी शाळा आणि कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. नोव्हेंबरमध्ये दिवाळी आणि छठ पूजा हे दोन सण आल्याने शाळा या बंद राहणार आहेत. नोव्हेंबरमध्ये किती दिवस शाळा बंद राहतील तसेच लॉन्ग वीकेंड देखील मिळणार आहे.




नोव्हेंबर महिन्यातील सुट्ट्या
तारीख उत्सव

११ नोव्हेंबर २०२३ छोटी दिवाळी
१२ नोव्हेंबर २०२३ दिवाळी
१३ नोव्हेंबर २०२३ वसूबारस पूजा
१५ नोव्हेंबर २०२३ भाऊ बीज
१९ नोव्हेंबर २०२३ छठ पूजा
२४ नोव्हेंबर २०२३ गुरु तेग बहादूर शहीद दिन
२७ नोव्हेंबर २०२३ गुरु नानक जयंती

दरम्यान, दिवाळी आणि छठला आणखी काही दिवस शाळांना सुट्ट्या दिल्या जाऊ शकतात. दिवाळीत अनेक राज्यात शाळांना १४ नोव्हेंबर पासून सुट्ट्या देण्यात आल्या आहेत. तर छठ पूजेच्या दिवशी देखील काही राज्यांतील शाळा दोन दिवस म्हणजे १९ आणि २० नोव्हेंबर रोजी बंद राहणार आहेत. १४ नोव्हेंबरला शाळा उघडल्या तरीही त्या दिवशी बालदिन (बाल दिन २०२३) असल्याने शाळांमद्धे विविध कार्यक्रम साजरे केले जाणार आहेत.

# गेवराईत १२ ग्रा.पं.वर राष्ट्रवादीचे वर्चस्व

## १५८ गावात गाव कारभारी निश्चित

९ ग्रा.पं. शिवसेनेकडे; भाजपाच्या ताब्यात फक्त तीन ग्रा.पं., ५ अपक्ष बीआरएसने खातं उघडलं

**प्रतिनिधी । गेवराई**

गेवराई : गेवराई तालुक्यामध्ये ३२ ग्रामपंचायतींसाठी मतदान झाल्यानंतर आज सकाळपासून मतमोजणीला सुरुवात झाली. यामध्ये १२ ग्रामपंचायतींवर माजी आ. अमरसिंह पंडित यांचे वर्चस्व राहिले तर नऊ ग्रामपंचायतींवर शिवसेनेचे तर भाजपाच्या ताब्यात फक्त तीन ग्रामपंचायती आल्या. पाच जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाले. तालुक्यात बीआरएसनेही आपले खाते उघडले

गेवराई तालुक्यातील ग्रा.पं.साठी मतदान झाल्यानंतर आज सकाळपासून तहसील कार्यालयात मतमोजणी झाली. यामध्ये उक्कडपिंप्री राष्ट्रवादीच्या ताब्यात आली, चकलांबा शिवप्रसाद खेडकर (सरपंच अपक्ष) उमापूर शिवसेना किरण आहेर, गैबीनगर तांडा राष्ट्रवादी, संगम जळगाव यशवंत नागरे भाजपा, बोरगाव थडी सकाराम खडके राष्ट्रवादी, गोपटपिंपळगाव उमेश आर्दड राष्ट्रवादी, सेलू राष्ट्रवादी, भेंडटाकळी श्रीराम उबाळे अपक्ष, पाडळसिंगी रितेश महादेव साबळे भाजपा, तांदळा सोनाजी राजेंद्र गवते अपक्ष, बेलगाव इंदूबाई बेदरे अपक्ष, हिंगणगाव राष्ट्रवादी, राहिरी गोपीनाथ फलके शिवसेना, ढालेगाव अरुण तौर राष्ट्रवादी, कांबी मंझरा शाम मुळे राष्ट्रवादी, भेंडखुर्द अश्विनी खेत्रे शिवसेना, पिंपळगाव कानडा सुमित्रा धापसे शिवसेना, शेकटा नंदाबाई शेंबडे अपक्ष, रसुलाबाद राष्ट्रवादी, आगर नांदूर भाजप-शिवसेना, कटचिंचोली स्वाती रविंद्र निवारे अपक्ष, काठोडा शैलेश कोरे भाजपा, गोळेगाव सिद्धेश्वर काळे राष्ट्रवादी, सिंधफणा चिंचोली अपक्ष, तळवट बोरगाव अलका गाडे शिवसेना, पांढरी सुंदर तिवारी शिवसेना, रामपुरी शिवसेना, रोहितळ अश्विनी बाबर शिवसेना, वाहेगाव आमला राष्ट्रवादी, औरंगपूर कुकडा राष्ट्रवादी, रेवकी शशीकला भगवान मस्के बीआरएस या ग्रामपंचायतींचे निकाल जाहीर झाले.

# पाटोद्यात मराठा आरक्षणासाठी पत्रकारांचे अन्नत्याग उपोषण संपन्न-सकल मराठा बांधवांकडुन कौतुक

पाटोदा (दत्ता वाघमारे)

पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी मराठा आरक्षणाला जाहीर पाठिंबा दिला असुन रविवार दि.५ रोजी सर्व पत्रकारांनी अन्नत्याग आंदोलन केले व सायंकाळी साडेपाच वाजता तहसीलदार बालाजी चितळे यांच्या हस्ते लिंबु पाणी पिऊन आंदोलनाची सांगता करण्यात आली या स्तुत्य उपक्रमाचे सकल मराठा बांधवांकडुन कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की सध्या महाराष्ट्र राज्यात मराठा आरक्षणासाठी साखळी उपोषण चालू असून पाटोदा येथे देखील मराठा आरक्षणासाठी मराठा समाज बांधव साखळी उपोषणास बसले असुन पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी जाहीर पाठिंबा दिला असून रविवार दिनांक.५ रोजी दिवसभर अन्नत्याग उपोषण करण्यात आले व तहसीलदार बालाजी चितळे यांच्या हस्ते सायंकाळी साडेपाच वाजता लिंबु पाणी देऊन उपोषणाची सांगता करण्यात आली यावेळी या आंदोलनास पत्रकार सोमीनाथ कोल्हे,पोपट कोल्हे,अजिज शेख,महेश बेदरे,सुधीर एकबोटे,हमीद खान पठाण,अब्दुल कादर मकराणी,दयानंद सोनवणे,रियाज सय्यद,किरण शिंदे पाटील,शेख महेशर,शेख जावेद,सखाराम भोसले,चंद्रकांत पवार,विजय जाधव,अमीर शेख,सचिन गायकवाड,अजय जोशी,सय्यद इमरान,संजय सानप, बबन उकांडे.भाऊसाहेब पवार.सचिन शिंदे,. ह.भ.प.लक्ष्मण महाराज सस्ते.बळीराम




जायभाय, अमोल येवले,राहुल सोनवणे सह उपस्थित होते.तर आलेल्या सर्व पत्रकारांचे आभार सकल मराठा समाजाच्या वतीने बाबा तिपटे यांनी मानले तर दिवसभर अनेकांनी भेट देऊन पाठींबा दिला.तसेच अकरा दिवस या साखळी आंदोलनाला सहकार्य करणाऱ्या युवकांचे कौतुक होत आहे.




# आदित्य कृषि महाविद्यालयातील कृषिदूतांनी दिली खामगाव येथील कृषि विज्ञान केंद्राला भेट

बीड ( महाराष्ट्र आरंभ न्युज) : आदित्य कृषि

महाविद्यालयातील चौथ्या वर्षातील कृषि कार्यानुभवचे कृषिदूत राम गडदे, महेश कवडेवार, प्रफुल देवगडे, अमोल चव्हाण, ज्ञानेश्वर गौरकर, भागवत शिंदे, विशाल गंद्रेवाड, उमेश गायकवाड यांनी खामगाव येथील कृषि विज्ञान केंद्राला भेट दिली आणि तेथे विविध प्रात्यक्षिक करण्याचे प्रशिक्षण घेतले. यावेळी कृषिदूतांना मार्गदर्शन करण्यासाठी खामगाव कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. झगडे सर हे उपस्थित होते. तसेच कृषि विस्तार विभागाचे विषयतज्ञ डॉ. डी. सी.पाटगावकर यांनी यावेळी कृषिदूतांना विविध प्रात्यक्षिकांबद्दल सखोल ज्ञान दिले. त्यानंतर कृषिदूतांनी ठरल्याप्रमाने एका आटवडचात प्रत्येकी दिवशी वेगवेगळ्या युनिट ला भेट दिली म्हणजे गांडूळखत युनिट, ऐझोला इत्यादि युनिट ला भेट दिली. तसेच कृषिदूतानी शेतात असणाऱ्या पीकांबद्दल सखोल माहिती प्राप्त केली. तसेच कृषिदूतानी ऑटोमॅटिक वेदर स्टेशन कसे काम करते यांची सुद्धा माहिती घेतली . यासाठी कृषिदूतांना आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य कृषि महाविद्यालयाचे डॉ. संदीप मोरे, कृषि विस्तार विभागाचे प्रमुख श्री. धावणे सर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

# दुष्काळानं कंबरडे मोडलेल्या तालुक्याला चक्क यादितुन वगळले पालकमंत्री आमदार आदि लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष

शिरुर कासार (प्रशांत बाफना)

अगोदरच मागासले पण असलेला हा भाग गेल्या कित्येक वर्षापासून या भागातील ऊसतोड मजूर सातत्याने ऊसतोड मजुरीसाठी जात असतात शिक्षणाचा अभाव लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष या सर्व चा त्रिवेणी संगम म्हणजे शिरूर कासार तालुका होय आणि या तालुक्यातील एवढी परिस्थिती बिकट असताना शासनाच्या दुष्काळाच्या यादीतून हा तालुका वगळणं म्हणजे अतिरेकच झाला असं म्हटले तर वावगे ठरणार नाही

तेव्हा या भागातील लोकप्रतिनिधी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आमदार आदी सर्व नेत्यांनी या तालुक्याचा पुन्हा अभ्यास करावा आणि शासनाच्या दुष्काळी यादीमध्ये हा तालुका कसा येईल यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी शिरूर कासार तालुक्यातील संतप्त शेतकरी ग्रामस्थ करीत आहेत

जन्मताच शिरूर कासार तालुक्याला दुष्काळाची छाया असल्या कारणामुळे या तालुक्याला गेली २५ वर्षे होऊन देखील अद्याप बाळसं आलेलं नाही आणि अशा या तालुक्याची अवस्था पोलिओ प्रमाणे झालेले आहे तरी देखील हा भाग आपल्या स्वकर्तुत्वावर कसातरी उभा ठाकलेला आहे परंतु या भागाला कोणाची तरी दृष्ट लागावी असं काम होतं आणि कुठल्यातरी चांगल्या यादीतून त्याचं नाव वगळलं जातं ही खंत मात्र कायम सर्वांच्या मनात आहे

तालुक्याच्या नशिबी तसाच दुष्काळ पूजलेला असून सातत्याने पर्जन्यमान कमी होत असल्या कारणामुळे सहाशे सातशे फुटावर बोरचे पाणी आहे नदी नाले कोरडे ठाक असतात चालू वर्षी तर वरच्या पावसामुळे कसंतरी सिंदफणा धरण काठावर आलेले आहे शिरूर कासार तालुक्याला वरदान लाभलेल्या पुतळा मध्यम प्रकल्पाच्या माध्यमातून शहराची ताण भागत असताना अद्यापही त्या उठाळा प्रकल्प मध्ये पाण्याचा साठा नाही पहिल्याच पाण्यावर शहराची तहान भागत आहे आणि यावर्षी पावसानं दडी मारल्यामुळे शेतीसह पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होणार आहे तेव्हा मायबाप सरकार यांनी आमची झालेली परिस्थिती पाहून या भागाची दुष्काळी छाया दूर करावी एवढीच मागणी एवढीच अपेक्षा एवढी भयाण परिस्थिती असताना आणि शेतकऱ्यांच्या गुरांना अद्याप चाऱ्याचं कुठलंही नामोनिशान नसताना हतबल झालेलं शेतकरी कारखान्याला गेल्याशिवाय पर्याय नसल्याचे कारण दाखवून जवळपास दसऱ्याच्या अगोदरच या भागातील स्थलांतर झालेला आहे सातत्याने दुष्काळाच्या छायेत असलेल्या तालुक्याला बीड जिल्ह्याचे पालक मंत्री तथा महाराष्ट्र शासनाची कृषिमंत्री नामदार धनंजय मुंडे साहेब यांनी या भागाची कोटकिडकीने काळजी घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून खरी आकडेवारी देऊन या भागाला दुष्काळाच्या छायातून वाचवा व तेवढेच उपकार होतील तसेच आष्टी पाटोदा आणि शिरूर कासार या भागाचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी देखील आपणही शेतकऱ्याचा मुलगा आहे याची जाण ठेवून या भागाला आपल्या माध्यमातून व आपल्या अभ्यासू वृत्तीतून खरोखरच न्याय द्यावा जेणेकरून या भागावर पडलेली अवकाळी छाया असताना देखील आपण कर्तव्यनिष्ठ आमदार आहात कुठल्या भागाची काही गोष्ट आपणास सांगण्याची गरज नाही तेव्हा आमच्या बळीराजासाठी आपण या तालुक्याचा दुष्काळी तालुका म्हणून समावेश करावा असे आवाहनही शिरूर कासार तालुक्यातील शेतकरी ग्रामस्थ करीत आहेत


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT